आणि सोन्याचा स्पर्श

लेखक: एल पार्किन्स

चित्र: हेग आणि रेजिना शकरजीन

अनुवाद: मेधा वाघ



राजा मिडास आणि सोन्याचा स्पर्श




लेखक: एल पार्किन्स

चित्र: हेग आणि रेजिना शकरजीन

अनुवाद: मेधा वाघ





राजा मिडासला सोने खूप आवडायचे.

तो सोन्याने बनवलेल्या पलंगावर झोपायचा.

तो त्याची निळी चिमणी सोन्याच्या पिंजऱ्यात ठेवत असे.

दररोज सकाळी निळी चिमणी त्याला जागे करण्यासाठी
गाणी म्हणत असे.

दररोज सकाळी राजा सोन्याचा मुकुट घालायचा.

तो रोज सकाळी आपली मुलगी , राजकुमारी मॅरीगोल्ड
बरोबर नाश्ता करत असे .


ते शाही द्राक्षाचा रस पीत.

ते शाही सॉसेज खात.

ते सोनेरी प्याल्यांमधून पीत

आणि सोन्याच्या ताटात जेवत.









नाश्त्यानंतर, राजा स्वतः
राजेशाही सोनारांना भेटत असे.
त्याचे शाही सोनार त्याच्यासाठी
सोन्याची घड्याळे आणि सोन्याचे टेबल बनवत .
ते त्याच्यासाठी माशाचा गळ ही बनवत .

रोज सकाळी राजा घोड्यावर बसून बाहेर पडत असे
तो त्याच्या राज्यभर सोन्याच्या शोधात फिरत असे .
नंतर सापडलेले सोने तो त्याच्या राजवाड्यात घेऊन
जात असे.


राजवाड्यातील त्याचे नोकर
सोने तळघरात घेऊन जात असत.
राजा एक गुप्त दार उघडत असे.

सेवक सारे सोने
एका मोठ्या अंधाऱ्या गुहेत ठेवत.
ती गुहा सोन्याने भरलेली होती.

राजा मिडास दररोज
स्वतःला गुहेत कोंडून घेई.
तो म्हणायचा “सोने , तुझे चमकणे
मला खूप आवडते.”

सोने ! सोने! सोने!
मी तुझ्यावर किती प्रेम करतो.





एके दिवशी राजा त्याच्या गुहेत होता.

त्याला एक आवाज ऐकू आला. म्हणून त्याने वर पाहिले.

त्याला एक विचित्र लहान माणूस दिसला.

" तू इथे कसा आलास ?" मिडासने त्याला विचारले.

" अरे , मी काहीही करू शकतो ."

तो छोटा माणूस म्हणाला.

" तुझी सर्वात मोठी इच्छा काय आहे ते सांग ?"



" माझी सर्वात मोठी इच्छा ?

"अर्थातच सोने!" राजा म्हणाला.

" मी ज्याला स्पर्श करीन ती प्रत्येक गोष्ट सोन्याची व्हावी
"


अशी माझी इच्छा आहे.

“ही खूप मोठी इच्छा आहे ."

तो छोटा माणूस म्हणाला.

“ही इच्छा तुला कदाचित आनंद देऊ शकणार नाही

पण जर तुला हेच हवे असेल तर...



 … मी तुझी इच्छा पूर्ण करतो.
तू वर जाऊन झोप
उद्या सकाळी तू ज्या गोष्टींना स्पर्श करशील
त्या सोन्याच्या होतील ”
अचानक एक प्रकाश चमकला
आणि तो छोटा माणूस गायब झाला.

त्या रात्री राजा मिडासला झोप लागली नाही.
त्याने संपूर्ण रात्र विचारात घालवली ,
" माझी इच्छा पूर्ण होईल का ?"
“मला खरोखर सोन्याचा स्पर्श मिळेल का?”





शेवटी सूर्य उगवला.

राजाची निळी चिमणी गाऊ लागली.

राजा उठून बसला.

त्याने हात पुढे करून निळ्या चिमणीला स्पर्श केला.

निळी चिमणी सोन्याची झाली.

खरंच!! राजा मिडास ओरडला

“माझा स्पर्श सोनेरी झाला आहे.”



त्याने त्याचा शाही कोट आणि पँट घातली.

त्याचा कोट आणि पँट सोनेरी झाले.

राजा मिडास त्याच्या राजवाड्यात धावला.

त्याने दरवाजा सोन्याचा केला.

त्याची खुर्ची सोन्यात बदलली.

त्याने छत्रीचे सोन्यात रूपांतर केले.

मग तो बागेकडे धावला.
तिथे त्याने एका बेडकाचे सोने केले.
त्याने लाल गुलाबांना स्पर्श केला.
त्याने सर्व गुलाब सोन्यात बदलले.

" बघ!" तो राजकुमारी मॅरीगोल्डला म्हणाला.
" बघ , मी काय करू शकतो!"

पण मॅरीगोल्डने कोणतेही उत्तर दिले नाही.
ती सोनेरी गुलाबांकडे पाहत राहिली.
ते कठीण आणि थंड होते.
त्यांच्यात सुगंध नव्हता.





राजा आणि राजकुमारी

नाश्त्याला गेले.

राजा मिडास खूप आनंदी होता.

त्याने शाही सॉसेज उचलला.

" अरे देवा!" राजा ओरडला.

" माझा सॉसेज सोन्याचा झाला”

"मी तो खाऊ शकत नाही ," तो म्हणाला.



त्याने द्राक्षाच्या रसाकडे हात केला.

" अरे!" राजा मिडास म्हणाला.

" सोनेरी द्राक्षाचा रस!"



" मला खायचे आहे!"

"मला भूक लागली आहे," तो ओरडला.

तो राजेशाही स्वयंपाकघराकडे धावला.


त्याने एक मासा उचलला.

तो सोन्याचा झाला.

त्याने सफरचंद आणि डोनट्स उचलले .

आणखी सॉसेज घेतले .

प्रत्येक वेळी परिणाम सारखाच होता.



हे दिवसभर घडले.
तो काहीही लिहू शकला नाही.
कारण त्याची शाई सोन्यात बदलली.
तो शेकोटी पेटवू शकला नाही.
कारण त्याचे लाकूड सोन्याचे झाले. .

राजाचे सर्व नोकर पळून गेले.
ते अशा राजवाड्यात
अजिबात काम करु शकत नव्हते.

त्या रात्री राजाने
दात घासण्याचा प्रयत्न केला.
आंघोळ करण्याचा प्रयत्न केला.
पण तो काहीही करू शकला नाही.

तो त्याच्या पलंगावर बसला.
आणि रडू लागला.





राजकुमारी मॅरीगोल्डने तिच्या वडिलांचे रडणे ऐकले.

ती तिच्या वडिलांच्या खोलीत आली.

" बिचारे बाबा ," राजकुमारी मॅरीगोल्ड म्हणाली .

" रडू नकोस बाबा! "

ती वडिलांकडे धावली .

तिने आपले हात पसरले.



राजा मिडासनेही आपले हात पसरले.

त्याने आपल्या मुलीला आपल्या मिठीत घेतले.

राजकुमारी सोन्याच्या पुतळ्यात बदलली .



दिवसेंदिवस राजा मिडास
त्याच्या सोन्याच्या महालात ,
त्याच्या सुवर्ण सिंहासनावर बसत ,
आणि त्याची मुलगी जी थंड सोन्याची मूर्ती
बनली होती तिला
पाहत राही.

मग अचानक एके दिवशी
पुन्हा प्रकाश पडला.
राजा मिडासने वर पाहिले.

तो विचित्र छोटा माणूस परत दिसला.
" राजा मिडास ," तो छोटा माणूस म्हणाला.

" मला वाटतं, मी तुझी
आणखी एक इच्छा पूर्ण करीन. “
“ तू सोन्यापेक्षा जास्त जर एखाद्या
 गोष्टीवर प्रेम करत असशील तर त्या
गोष्टीची इच्छा कर राजा मिडास,
मनापासून इच्छा कर!”



राजा मिडास आनंदाने उभा राहिला.

त्याला मनापासून जे हवे होते त्याची त्याने इच्छा

केली आणि हात पुढे केला

आणि त्याच्या थंड झोपलेल्या मुलीला स्पर्श
केला.

त्याची इच्छा पूर्ण झाली.

त्याने आपल्या मुलीला सोन्यातून परत माणसात
बदलले .





ते दोघे राजवाड्यातून फिरले.
राजाने सर्व गोष्टींना स्पर्श केला.

त्या सगळ्या गोष्टी जशा

पूर्वी होत्या तशा झाल्या.

सर्व मूळ रुपात परत आले.

त्याने गुलाबांना स्पर्श केला.

त्याने बेडकाला स्पर्श केला.

त्याने छत्रीला स्पर्श केला.

त्याने निळ्या चिमणीला स्पर्श केला.

शेवटी, त्याने शाही सॉसेज आणि
शाही द्राक्षाच्या रसाला स्पर्श केला.

राजा मिडास आणि राजकुमारी मॅरीगोल्ड
नाश्ता करायला बसले.
तो आजवरचा सर्वात आनंददायी नाश्ता होता .



"सोने ! सोने! सोने!

"माझे माझ्या सोन्यावर किती प्रेम आहे !"

राजा मिडास म्हणाला.

"मी ज्याला स्पर्श करीन ती सोन्याची होऊन

जाऊ दे अशी मी इच्छा करतो "

बिचारा राजा मिडास ,

दुर्दैवाने, त्याची इच्छा पूर्ण झाली.

